आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
११ फेब्रुवारी २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्रीय अर्थसंकल्पावर आज लोकसभेत चर्चा पुढे सुरु

- महाराष्ट्रात रेल्वे विकासाचे दीड लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरु असल्याचं रेल्वे मंत्र्यांचं लोकसभेत निवेदन

- लोकसभेतले विरोधी पक्षने◌ेते राहुल गांधी, राष्ट्राच्या सुरक्षेच्या मुद्द्याचा वापर राजकारणासाठी करत असल्याचा संसदीय कामकाज मंत्र्यांचा आरोप

- राष्ट्रीय गीत वंदे मातरमची सर्व सहा कडवी वाजवण्याचे केंद्र सरकारचे दिशानिर्देश जारी

- मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदाचा पदभार रितू तावडे यांनी तर उपमहापौरपादचा कार्यभार संजय घाडी यांनी स्वीकारला

**आणि**

- आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय नेमबाजांची आणखी ३९ पदकांची कमाई

**<><><><><>**

लोकसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला आज पुन्हा सुरुवात झाली.

लोकसभेचं आजचं कामकाज सुरू झाल्यावर पीठासीन अधिकाऱ्यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. त्याचवेळी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आम्हाला न्याय हवा, अशा घोषणा सुरू केल्या. त्यामुळे सभागृहात गदारोळाच्या वातावरणातच प्रश्नोत्तराचा तास सुरू झाला. दरम्यान, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी साडे अकरा वाजताच्या सुमारास घोषणाबाजी करत सभात्याग केला.

**महाराष्ट्रात** एक लाख ५० हजार कोटी रुपयांचे रेल्वे विकासाचे प्रकल्प सुरू असल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत दिली. ते पुरवणी प्रश्नाला उत्तर देत होते. महाराष्ट्रासाठी अर्थसंकल्पात २३ हजार ९२६ कोटी रुपयांची तरतूद केली आहे, राज्यातल्या अनेक औद्योगिक शहरांना जोडण्यासाठी काम सुरू असल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट वैष्णव**

पश्चिम बंगालमधल्या रेल्वेकरता अर्थसंकल्पात १४ हजार २०५ कोटी रुपयांची तरतूद केल्याचं रेल्वेमंत्र्यांनी सांगितलं. यूपीए सरकारच्या काळात बंगालसाठी रेल्वेकरता केवळ चार कोटी ३०० कोटी रुपयांची तरतूद केली होती, असं ते म्हणाले.

केंद्र सरकारने ग्रीन कॉरीडॉर फेज १ अंतर्गत दहा हजार कोटी रुपये आणि फेज २ अंतर्गत बारा हजार कोटी रुपयांचं वितरण केल्याची माहिती केंद्रीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना दिली. तसंच देशांतर्गत ऊर्जा निर्मिती क्षमता १४४ वॅटपर्यंत पोहोचल्याचंही जोशी यांनी सांगितलं.

**दरम्यान,** लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यावरचा अविश्वास दर्शक ठराव विरोधी पक्षांनी लोकसभेच्या महासचिवांना सादर केला होता. या ठऱावात काही त्रुटी आढळल्यामुळे तो फेटाळला जाऊ नये म्हणून त्यात दुरुस्ती करावी अशी सूचना ओम बिर्ला यांनी सचिवालयाला केली. त्यानंतर त्यात दुरूस्ती करून ठराव पुन्हा सादर करण्यात आला.

काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्षासह विविध पक्षांच्या ११८ सदस्यांनी याला पाठिंबा दिला आहे. या अविश्वास दर्शक ठरावावर जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपर्यंत लोकसभेच्या कामकाजात सहभागी न होण्याचा निर्णय सभापती ओम बिर्ला यांनी घेतला आहे.

राज्यसभेत सभागृहाच्या कामकाजाची सुरुवात शून्य प्रहराने झाली. विविध पक्षाच्या सदस्यांनी अनेक महत्त्वाचे मुद्दे सभागृहात उपस्थित केले.

<><><><><>

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्याचा वापर राजकारणासाठी करत असल्याची टीका संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केली आहे. ते संसद भवन परिसरात वार्ताहरांशी बोलत होते. राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा हा अतिशय महत्त्वाचा असून राजकीय फायद्यासाठी त्याचा वापर करू नये असं आवाहन त्यांनी गांधी यांना केलं.

लोकसभा सभापतींवरल्या अविश्वास प्रस्तावाबद्दल विचारलं असता हे कृत्य हे सभापतींच्या प्रतिष्ठेला बाधा आणणारं आहे, असं रिजिजु म्हणाले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सभागृहाच्या नियमांचं पालन करावं असं ते म्हणाले.

<><><><><>

बँक खात्याला अद्यापही आधार क्रमांक न जोडल्यामुळे पंजाब आणि हरियाणामधले हजारो शेतकरी प्रधानमंत्री किसान योजने अंतर्गत शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या मदतीपासून वंचित आहेत, अशी माहिती केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी काल लोकसभेत दिली.

<><><><><>

थोर विचारवंत आणि जनसंघाचे संस्थापक सदस्य पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची आज पुण्यतिथी. त्यानिमित्तानं उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्यांना आदरांजली.

उपाध्याय यांनी दूरदर्शी विचारवंत आणि राष्ट्रनिर्माते म्हणून आपलं संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी अर्पण केलं असून अखंड मानवतावादाचं त्यांचं तत्व

संपूर्ण जगासाठी प्रासंगिक आहे, असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या मूल्यांवर आधारित सिद्धांत आणि विचार देशाच्या प्रत्येक पिढीला मार्गदर्शन करतील, अशा शब्दात प्रधानमंत्र्यांनी त्यांना आदरांजली वाहिली.

शेवटच्या स्तरावर असलेल्या व्यक्तीचा विकास म्हणजेच राष्ट्राचा विकास असा विचार मांडणारे पंडित उपाध्याय भविष्यातल्या पिढयांना राष्ट्र उभारणीसाठी प्रेरणा देत राहतील, असं शहा यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पंडित दीनदयाळ यांना आदरांजली वाहिली.

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी देखील पंडित दीनदयाळ यांना आदरांजली वाहिली.

<><><><><>

केंद्रसरकारने राष्ट्रीय गीत वंदे मातरम संदर्भात आज नवे दिशानिर्देश जारी केले. त्यानुसार सरकारी कार्यक्रमांमधे, शाळांमधे, तसंच इतर महत्त्वाच्या कार्याक्रमांमधे जन गण मन या राष्ट्रगीतानंतर लगेचच वंदे मातरम् वाजवणे अनिवार्य असेल. वंदे मातरम गीताची सर्व सहा कडवी वाजवली जातील. यापूर्वी वंदेमातरमची दोनच कडवी प्रचलित होती, आता मात्र हे गीत संपूर्ण वाजवलं जाईल असं या दिशानिर्देशांमधे म्हटलं आहे. राष्ट्रपती किंवा राज्यपाल यांच्या आगमन-प्रस्थानाच्या वेळी, त्यांच्या भाषणापूर्वी आणि नंतर तसंच राष्ट्रध्वजारोहणाच्या वेळी हा नियम लागू राहील. गृह मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलंय की हे गीत वाजवले किंवा गायलं जात असताना उपस्थितांनी सावधान मुद्रेत उभे राहावं.चित्रपटगृहातल्या मध्यंतराचा मात्र या नियमात समावेश नाही.

<><><><><>

भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका रितू तावडे यांनी आज मुंबईच्या महापौर म्हणून कार्यभार स्वीकारला. शिवसेनेचे संजय घाडी यांना उपमहापौर पदाचा कार्यभार स्वीकारला. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड प्रक्रियेत रितू तावडे आणि संजय घाडी यांची महापौरपदी बिनविरोध निवड झाल्याची औपचारिक घोषणा झाली. यावेळी मुखमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच दोन्ही पक्षाचे मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

इंडिगो विमान कंपनीला नागरी विमानवाहतूक संचालनालयानं नियमात दिलेली सवलत समाप्त झाली आहे. गेल्या डिसेंबरमधे या नियमांमुळे इंडिगोच्या उड्डानांमधे गोंधळ होऊन प्रवाशांची प्रचंड गैरसोय झाल्यामुळे कंपनीत नियमातून तात्पुरती सूट देण्यात आली होती, ती कालपर्यंतच वैध होती, असं डीजीसीएनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

भगवान बुद्धांचे पवित्र देवनीमोरी अवशेष आज भारतात परत आणले जाणार आहेत. गेल्या आठवडाभरापासून हे अवशेष श्रीलंकेत कोलंबो इथल्या गंगारामया मंदिरात दर्शनासाठी ठेवलेले होते. मध्य प्रदेशाचे राज्यपाल आणि अरुणाचल प्रदेशाचे उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली एक प्रतिनिधी मंडळ यासाठी श्रीलंकेत गेलं होतं. हे अवशेष प्रथमच आंतरराष्ट्रीय प्रदर्शनासाठी भारताबाहेर नेण्यात आले होते. या प्रदर्शनामुळे भारत आणि श्रीलंकेतलं सांस्कृतिक संबंध आणखी दृढ झाले आहेत.

**<><><><><>**

सरकारने भेल अर्थात भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेडमधल्या ३ टक्के समभागांची गुंतवणूक काढून घेतल्याने भेलचे शेअर्स आज ६ टक्क्यांपेक्षा जास्त घसरले.

**<><><><><>**

नवी दिल्ली इथं झालेल्या आशियाई रायफल आणि पिस्तूल अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय नेमबाजांनी काल आणखी सुवर्णवेध घेत पदकांची संख्या ३९ वर नेली. प्राची गायकवाडने महिलांच्या कनिष्ठ गटांत ५० मीटर रायफल थ्री-पोझिशन प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. सांघिक स्पर्धेत कनिष्ठ गटात महिलांनी ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात आणखी एका सुवर्णपदकांवर नाव कोरलं आणि या स्पर्धेत एकंदर १ हजार ७४८ गुणांची कमाई करत अव्वलस्थानी आहे.

**<><><><><>**

आयसीसी टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आज ग्रुप ‘डी’ मधे दक्षिण आफ्रिका विरुद्ध अफगाणिस्तान हा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर सुरु आहे. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेने ६ गडी गमावून अफगाणिस्तानसमोर विजयासाठी १८८ धावांचं आव्हान ठेवलं आहे. शेवटची बातमी मिळाली तोपर्यंत अफगाणिस्तानच्या १० षटकात ३ गडी बाद ९३ धावा झाल्या होत्या. ग्रुप ‘बी’ मधे ऑस्ट्रेलियाचा सामना आज आयर्लंडबरोबर श्रीलंकेत कोलंबो इथं दुपारी ३ वाजता होईल. मुंबईच्या वानखेडे मैदानावर संध्याकाळी ७ वाजता ग्रुप ‘सी’ मधे इंग्लंड विरुद्ध वेस्ट इंडीज हा सामना रंगणार आहे.कालच्या सामन्यांमधे पाकिस्तानने अमेरिकेचा ३२ धावांनी पराभव केला, तर न्यूझीलंडने संयुक्त अरब अमिरातींच्या संघावर १० गडी राखून दणदणीत विजय मिळवला. नेदरलँड्सने नामिबियाविरुद्धचा सामना ७ गडी राखून जिंकला.

**//<><><><><>//**